जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/०९/२०२३
## दि.२५/०९/२०२३ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४७१/२०२३,भादविक ३०७,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४०वर्षे,रा.स.नं.१०८/१०९,रामटेकडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व त्याचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०९/२०२३ रोजी १६/४५ वा.बारामती ॲग्रो चिकन सेंन्टरच्या समोर स.नं. १०८, रामटेकडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्षे व त्याचा मित्र याचेसह चालत साठे उद्यानाकडे जात असताना यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,दिनांक २४/०९/२०२३ रोजी टेम्पो न दिल्याच्या कारणावरुन झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन, फिर्यादी यांचे अल्पवयीन मुलास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,धारदार हत्याराने, लोखंडी रॉडने तसेच फरशीच्या तुकड्याने डोक्यावर,मानेवर,तसेच शरिरावर इतर ठिकाणी वार करुन,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. माया गावडे ८५९१४१५०२८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४५५/२०२३,भादविक ३२३,३२४,५०४,५०६,क्रिमिनल लॉ अमें.ॲक्ट क. ७ |
| **फिर्यादी** | बाळासाहेब घुले,वय-५० वर्षे,रा.गावठाण,मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०९/२०२३ रोजी २०/४० वा.फिर्यादी यांचे राहते घरासमोर ते रात्री २१/०० वा.चे दरम्यान मांजराई मंदीरा समोरील रस्त्यावर संजय पवार यांचे लॉन्ड्री समोर मांजरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरा समोर भैरवनाथ गणेश मंडळाची विसर्जन मिरवणुकी मध्ये स्पिकरचा आवाज कमी करण्यास सांगितल्याचे कारणावरुन,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे नातेवाईक व शेजारी असलेल्या महीला यांना शिवीगाळ करुन फिर्यादीस लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण केली आहे. तसेच त्यांचे हातातील लोखंडी रॉड व लाकडी दांडके हवेत जोर-जोरात फिरवुन मोठ-मोठयाने धमक्या देवुन सदर परीसरात दहशत निर्माण केली आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. दाभाडे ९३२२३५८०२७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६५५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२१ वर्षे,रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०९/२०२३ रोजी १७/३० वा.सहयाद्री हॉस्पीटल रोडवरून शास्त्रीनगर बस स्टॉप येरवडा,पुणे येथे पायी जातेवेळी रस्त्यावर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया शास्त्रीनगर बस स्टॉप येथे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे समोरून जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील मोबाईलला जोरात झटका मारून,त्यांचे हातातील १०,०००/- रू किमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. होले ८८८८८७४१४३ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २७४/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,मोव्हेॲक्ट १८४,१३४,१८७ |
| **फिर्यादी** | दिनेश शावने,वय-२८ वर्षे,रा.गुरुद्वारा कॉलनी,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | ट्रक क्र.MH/46/F/8595 हिचेवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०९/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा.लेन नं.१४,टिंगरेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील रामचंद्र शावने हे कामावरुन मोटार सायकलवरून राहते घरी येत असतांना,यातील नमुद ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार रामचंद्र शावने यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरी. एस.एस.माळी ९८२३७१७०८० |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३२०/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-७८ वर्षे,रा.पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी १७/५५ ते ०६/३० वा.चे दरम्यान वसंत टॉकीज ते स्वारगेट येथील शिवाजी रोडवरील हॉटेल गोकुळ भवन समोरील सिग्नलचे दरम्यान प्रवासा मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे उजव्या हातातील सोन्याच्या धातुची बांगडी १,१०,०००/- रु किची कशाचेतरी सहाय्याने कटींग करुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, संदिप तळेकर |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २२४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३२ वर्षे,रा.कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०९/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा.ते ०१/४५ वा.चे दरम्यान डॉ.कोयाजी रोड ते क्लोअर सेंटर कॅम्प,पुणे दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया क्लोअर सेंटर कॅम्प,पुणे येथे शॉपिंग करीत असताना,त्यांचे जवळील सोन्याचे दागिने हे कापडात गुंडाळुन प्लास्टिकचे पिशवी मध्ये ठेवुन ते पर्स मध्ये ठेवले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांची नजर चुकवुन,सदर खरेदी दरम्यान सोन्याचे दागिने ३,२८,०००/- रू किचे पर्ससह चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, प्रमोद गायकवाड ९२८४६४२०८१ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १५६/२०२३,भादविक ३७९,३२३,५०४,५०६, ३४ |
| **फिर्यादी** | समशेर शेख,वय-५६ वर्षे,रा.धोत्रेवाडा,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | कार व दुचाकीवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०९/२०२३ रोजी पहाटे ०३/१५ वा.ते ०३/३० वा.चे दरम्यान मित रिवेरा सोसायटी, ढोले-पाटील रोड लेन नं.१२ या सोसायटी मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व साक्षीदार सुधीर लोंढे असे मित रिवेरा सोसायटी मध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन हजर असताना,सदर सोसायटीचे गेटचे आतील भिंतीलगत असलेले ०२ चंदनाची झाडे यातील नमुद इसमांनी सोसायटीचे गेटचे भिंतीवरुन आत येवुन,फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,स्वयंचलीत करवतीचा सहाय्याने चंदनाची झाडे ३०,०००/- रु किची बुंध्यापासुन कापुन,त्याचे तुकडे करुन त्यांचे कार मध्ये भरुन चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेश वराळ ९७३०७८६०६७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**